पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/६४१/२०१२
दिनांक- २६/०७/२०१२

प्रति,
मा. ....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक ३१.७.२०१२ रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ३१.७.२०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक- १७

दिनांक- ३१.७.२०१२ वेळ- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ३१/७/२०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक २४/७/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक- १) मनपाच्या वाय.सी.एम.रूग्णालयाच्या लॉण्ड्री विभागातील उपकरणे / मशिनरीचा वापर करून लिनन (कपडे) धुलाईकामी निविदा प्रक्रियेचे कार्यवाही अंतिम टप्प्यात आली असून लवकरचा ई-निविदा नोटीस प्रसिध्द करण्यात येणार असल्यामुळे मे.सारा ट्रेडर्स प्रा.लि. यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना दिनांक ३१/८/२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यास व येणारे अंदाजे प्रतिमहा र.रू.९५,०००/- [र.रू.पंच्यान्नव हजार] अथवा प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २) यांत्रिक पध्दतीने जंतुनाशक व किटकनाशक औषध फवारणी करणे याकामाची नविन निविदा प्रक्रिया चालू असून त्यासाठी काही कालावधी लागणार असल्याने सद्यःस्थितीत पावसाळ्याचे दिवस असल्याने प्रभाग कार्यक्षेत्रात यांत्रित पध्दतीने औषध फवारणी करणे गरजेचे असल्याने मे.मल्हार एंटरप्रायजेस यांना नि.क्र.३/२०१०-११ अन्वये अ, ब, क ड प्रभागासाठी दिलेल्या मंजुर निविदा दराने (प्रति दिन ८ तासाकरिता प्रति युनिट) चे कामासाठी अ, ब, क ड प्रभाग कार्यक्षेत्रामध्ये यांत्रिक पध्दतीने जंतुनाशक व किटकनाशक औषध फवारणी करणेकामी ३ महिने कालावधीकरिता मुदतवाढ देणेस व त्याकामी प्रत्यक्ष येणाऱ्या र.रू.५,०४,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३) मनपा कर्मचारी श्री.कांबळे डी.डी., जकात निरिक्षक, श्री.गायकवाड व्ही.एम. मुख्यलिपिक, श्री.जाधव अशोक एस. शिपाई यांना श्रवणयंत्रे खरेदीकामी र.रू.१,३०,८७५/- [र.रू.एक लाख तीस हजार आठशे पंच्याहत्तर] इतका खर्च झालेला असून सदरचा खर्च हा नागरवस्ती विभागाकडील 'अपंग कल्याणकारी योजना' या लेखाशिर्षावर खर्ची टाकण्यात आला असून

सदरच्या खर्चास कार्योत्तर व यापुढे अंध क्षीणदृष्टी, मुकबधीर व अस्थिव्यंग कर्मचाऱ्यांना त्यांनी मागणी केल्यानुसार त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी शासनमान्य संस्थेकडून उपकरणे खरेदी करणेसाठी होणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ४) मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.२/२०१२-२०१३ मधील अ.क्र.४ अन्वये, मनपाचे चिखली रोपवाटीका येथे माती, प्लॅस्टीक पिशव्या यांचा पुरवठा करून माती, खत एकत्रीत करून पिशव्या भरून बेडला लावणेकामी मे.प्रियंका एन्टरप्रायजेस (नि.र.रू.४,२३,७०७/- [र.रू.चार लाख तेवीस हजार सातशे सात] पेक्षा १७.७५ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ५) वाय.सी.एम.रूग्णालयाच्या बायोमेडिकल वेस्ट (मॅनेजमेंट व हॅडलिंग) नियम १९९८ नुसार परवाना नुतनीकरणाकामी येणारा र.रू.१,०२,०००/- [र.रू.एक लाख दोन हजार] खर्च रूग्णालयाचे इतर खर्च या लेखाशिर्षातून अदा करणेस व सदरची रक्कम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांना अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ६) नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ७) मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र. १४/११/१२ मधील अ.क्र.१३ अन्वये, चिखली मैलाशुध्दीकरण केंद्र नवे व जुने यांची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.एक्सल इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू.३३,०६,५८२/- [र.रू.तेहतीस लाख सहा हजार पाचशे ब्याऐंशी] पेक्षा ४.५० % कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ८) मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ९) वाय.सी.एम.हॉस्पीटल येथील लिफ्ट्स चे वार्षिक देखभाल दुरुस्ती (सन २०१२ ते २०१३) मे.ओटीस इलेव्हेटर या उत्पादक कंपनीकडून पुढील एक वर्ष कालावधीकरीता थेट पध्दतीने करारनामा करून, करवून घेणेस व त्याकामी येणारा खर्च

र.रू.५,२०,७९९/- [र.रू.पाच लाख वीस हजार सातशे नव्यान्नव] मे.ओटीस इलेव्हेटर कं.यांस आगावू अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १०) शासन निर्णयात नमुद केल्यानुसार प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे घरबांधणी व इतर अग्रिमासाठी सुचविलेल्या धोरणास व अटीस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ११) मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१/१२/१३ मधील अ.क्र. ३ अन्वये, तालेरा रूग्णालय विस्तारीकरण इमारतीचे मराविवि कंलि मंजुर वाढीव वीजभाराचे अनुषंगाने विद्युत विषयक कामे करणेकामी मे.कमलचंद्र इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू.४७,७४,३९४/- [र.रू.सत्तेचाळीस लाख चौऱ्याहत्तर हजार तीनशे चौऱ्यान्नव] पेक्षा २७.५० % कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १२) मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१/१२/१३ मधील अ.क्र. १ अन्वये, तालेरा रूग्णालय विस्तारीकरण इमारतीमध्ये विद्युत विषयक कामे करणेकामी मे.ॲनमॅक इलेक्ट्रिकल्स प्रा.लि. (नि.र.रू.९५,१३,९९२/- [र.रू.पंच्यान्नव लाख तेरा हजार नऊशे ब्यान्नव] पेक्षा १७.७७ % कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १३) मा.विधी समिती सभा दिनांक २१/०७/२०१२ ठराव क्र.३५ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका जकात नियम २००१ चे अनुसूची १ व २ मधील दर समानिकरणाकामी प्रस्तावा सोबत प्रपत्र अ जोडले असून त्यामध्ये प्रपत्र ब च्या यादीप्रमाणे एकूण १८ बाबींच्या नमूद मालावर प्रस्तावित केलेले सुधारित जकात दर कायम करणेस व त्या प्रमाणेचे अनुसुचीबाबत नागरिकांच्या हरकती सुचना मागविणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १४) मा.विधी समिती सभा दिनांक २१/०७/२०१२ ठराव क्र.४३ नुसार, प्रभाग स्तरावर स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, आरोग्य, प्रशासन, मलनिःसारण इ. विभागीय कामे करणेत येतात. सद्यस्थितीत प्रभाग स्तरावर प्रभाग अधिकारी यांना १०,००,०००/- पर्यंतच्या प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजूरी देणेचा अधिकार आहे. प्रभागाच्या कामकाजाचे व्याप्तीत वाढ झाल्यामुळे खर्च मर्यादा १०,००,०००/- ऐवजी २५,००,०००/- पर्यंत प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजूरीचे अधिकार सर्व प्रभाग समित्यांना देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १५) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२५.६.१२ ते १.७.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/४६/२०१२ दि.२६.७.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १६) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२.७.१२ ते ८.७.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/४७/२०१२ दि.२६.७.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १७) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.९.७.१२ ते १५.७.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/४८/२०१२ दि.२६.७.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १८) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१६.७.१२ ते २२.७.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/४९/२०१२ दि.२६.७.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/६४१/२०१२
दिनांक : २६/०७/२०१२ चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८,**

**प्रपत्र - ब**

**मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक ३५ दिनांक २१/०७/२०१२ चे लगत**

| अ. क्र. | | वस्तुचे नाव | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १३ | अ) | सर्व प्रकारची सुकविलेली किंवा जतन केलेली फळे व कवचफळे डबाबंद मासळी, चीज, कन्फेक्शनरी, मुरंबा व जेली, आईसक्रिम, सर्व प्रकारचे पिठूळ अन्न, लोणची, कोको व कोकोच्या बीया, चॉकलेट्स, बिस्किटे व केक, प्राण्यांची पातळ चरबी (लार्ड ) किंवा प्राण्यांची खाद्य चरबी, मावा, दुधाची मलई, चक्का, फळांचे रस, सरबते व सर्व पेये, बेव्हरेजेस (उदा. कोकोकोला, पेप्सी इत्यादी सारखे) ग्लुकोज, डेस्ट्रोज किंवा कोणतीही कलशर्करा (खाद्य तेलाव्यतिरिक्त) तेल्याच्या दुकानातील माल, परिरक्षित किराणामाल, बेकिंग पावछर, सॅकरिन, सर्व प्रकारचे खाद्य रंग व अर्क, इतर सर्व प्रकारचे ग्लुकोज, सातुचे वाळवीलेले सत्व, (माल्ट एक्स्ट्रॅक्ट) मध, पापड, सर्व प्रकारचे वेफर्स, शेवई, कोणत्याही वापरासाठी संस्करण केलेले मांस, स्किमड मिल्क पावडर, निरा व सर्व प्रकारचे अन्न किंवा पेय आणि सर्व प्रकारचे काजू व काजू बिया | ४.०० |
| | ब) | एरिएटेड वॉटर, मिनरल वॉटर, विशुध्द जल | ४.०० |
| ३१ | | फटाके, दारूकाम व त्याचे घटक, सेफ्टी फ्युज | ४.०० |
| ४४ | | सर्व प्रकारचे सिमेंट,सनला (सागोळ) | ४.०० |
| ४५ | | डांबर (कोल टार) अस्फाल्ट, बिटयूमेन, फरसबंदी दगड, मॅंगनिज,इमरी दगड किंवा खडी, दगडाच्या चिपा (स्टोन चिप्स) दगडाची धातूखळ, आग्रा दगड, इमारती दगड, डांबर मिश्रित धातूखळ, डांबर मिश्रित धातूखळ, डांबर मिश्रित कच (ग्रिट) सिमेंट मिश्रित खडी (तयार कॉंक्रीटचा माल) | ४.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४६ | | चकाकी दिलेल्या विटा व फरशा (टाईल्स), संगमरवरी दगड, भटटीच्या विटा, विटा, सर्व प्रकारची छप्परी कौले,पलोअरींग टाईल्स,फरशीच्या लाद्या इ.चायना मोझाईक चिप्स, मोझाईकचा सगमरवरी दगड,मोझाईक किंवा टेरेझोची कौले, चिनी मातीचे पांईप, मातीचे पाईप, सिमेंटचे पाईप, अस्बेस्टॉस सिमेंट पत्रे,सिमेंटच्या कुंडया,नक्षीदार जाळया सारख्या वस्तू,सिमेंट ब्लॉक्स व ग्रॅनाइड | ४.०० |
| ५२ | | प्लायवूड, सॉपटबोर्ड, हार्डबोर्ड, मॅसोनाइड किंवा कोणतेही घटक असलेले व कृत्रिम प्रक्रियेने तयार करण्यात आलेले इतर कोणत्याही प्रकारचे लाकूड व त्यापासून तयार करण्यात आलेले इतर कोणत्याही प्रकारचे लाकुड व त्यापासून तयार केलेल्या वस्तू व सर्व प्रकारचे फर्निचर, सनमायका, फॉरमायका आणि सर्व प्रकारचे प्लायवूडस् | ४.०० |
| ५३ | अ) | केसाचे तेल , सुगंधी तेले, सर्व् प्रकारचे सुगंधी द्रव्ये, सेंटस् , अत्तरे, सुगंधीत वस्तू, उदबत्या, सुगंधी रसायने, प्रसाधनगृहांसाठी आवश्यक असणा-या सर्व प्रकारच्या वस्तू, दाढीचे क्रीम, दाढीचा साबण, दंतमंजन, दाताची पेस्ट, पोमेड, फण्या, कंगवे, ब्रश, केसाच्या पिना, ब्रेसेस, गार्टर्स, सस्पेंडर्स, उदा.धूप, लोबान | ४.०० |
| ५३ | क) १ | लेसेस,टेप्स, लाकडी व धातूच्या रिंग्ज,भरतकामाच्या वस्तू, सेल्यूलाईड व सेल्यूलाईडच्या वस्तू, सर्व प्रकारचे मणी, कृत्रीम मोती, बेकेलरइट व बेकेलाइडच्या वस्तू, हस्तीदंत व हाडे यापासून बनविलेल्या वस्तू, सर्व प्रकारची बटणे(शर्ट इ.वस्तूंचे) किरकोळ जिन्नस, हॅबरडॅशरी, बूट लेसेस ब्लँको, ब्रासो,छत्र्या व छत्र्यांचे सामान, काठया,चाबूक, टेप्स, कॅनव्हासच्या पिशव्या, होल्डॉल्स,प्लेइंग बॉल्स, गोटया, पॉलिश पेपर्स,बुचे,गंध, फिशिंग रॉड आणि इतर फॅन्सी गुडस्, रक्षाबंधनाच्या राख्या | ४.०० |
| ५३ | क(३) | सर्व प्रकारच्या प्लॅस्टीक पिशव्या | ८.०० |
| ५३ | ड) | लाकडी, लोखंडी, पोलादी, वेताचे, प्लॅस्टीक व फायबर इ.सारखे सर्व प्रकारचे फर्निचर | ४.०० |
| ७४ | ई) | संगणक त्यांचे घटक व सुटे भाग व संगणकाच्या मायक्रोचिप्स, कुलिंग सिस्टिम बनवण्यासाठी आयात होणारा माल, फ्लॉपी, सीडी, बॅकअप मशिन, कार्टेज, सर्व प्रकारचे सॉफ्टवेअर अशा व इतर वस्तू. | ४.०० |
| | ह) | मोबाईल, पेजर, सिमकार्ड, सिमकार्ड ॲक्टिवेशन/ रिन्युअल स्लीप कुपन इत्यादी. | ४.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७५ | अ) १) | मोटारी, मालमोटारी, सर्व प्रकारची साधने, कार, बसेस, क्रेन, ट्रेलर, टेम्पो, रिक्षा, फोर्कलिफ्ट, एक्सेव्हेटर्स, सर्व प्रकारची प्रवासी साधने, रोडरोलर्स, बुलडोजर्स, ट्रॅक्टर्स, कॉंक्रिट मिक्सर, जीप, सर्व प्रकारच्या वाहनांच्या चॅसीज तसेच विशेष रित्या तरतूद न करण्यात आलेली सर्व प्रकारची देशी व विदेशी वाहने. | ४.०० |
| | | मोटर सायकल, स्कूटर्स, मोपेड्स | |
| ७६ | अ) | उपकरणे, उपकरण संचा व उपयंत्रे व त्यांचे भाग शिवणयंत्रे व शिवणकाम व विणकामाची एम्ब्रॉयडरी यंत्र, ओव्हर लॉकिंग व इंटरलॉकिंग यंत्र, सर्व प्रकारची सर्व घडयाळे, टंकलेखन यंत्र, इलेक्ट्रॉनिक टंकलेखन यंत्र व त्यांचे सुटे भाग व घटक भाग. | ४.०० |
| ७६ | ब) १) | रेडिओग्राम उपकरण संच, ग्रामोफोन्स, ॲम्प्लिफायर्स, वायरलेस (यंत्र), सर्व प्रकारची संगीत वाद्ये, ऑडिओ-व्हिडिओ कॅसेट्स, मायक्रोफोन्स, व्हिडिओ गेम्स, वॉकमन, टेलिफोन संच, फॅक्स संच, दूरध्वनी संचासाठी वापरण्यात येणारे अंतर्गत साहित्य, लॅपटॉप संच, इंटरनेट आणि वेबसाईट मशीनरी आणि त्यांचे घटक भाग, सुटे भाग आणि पूरक भाग, तयार (रेडिमेड) रेडिओ, टेपरेकॉर्डर दूरदर्शन संच, सर्व प्रकारचे स्पिकर्स, सीडी प्लेअर, डिव्हीडी, व्हिसीडी आणि व्हिसीआर. | ४.०० |
| ७६ | ब) २) | सर्व प्रकारचे रेडिओ, दूरदर्शन संच, सर्व प्रकारचे स्पिकर, साउंड सिस्टिम, टेपरेकॉर्डर, सीडी प्लेअर, डिव्हीडी, व्हिसीडी आणि व्हिसीआर तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे घटक व सुटे भाग तथापि, इतरत्र विशिष्टरित्या नमूद केलेले घटक भाग, सुटे भाग, पूरक भाग वगळून. | ४.०० |
| ८६ | | वरील कोणत्याही बाबीत समाविष्ट न केलेल्या व अनुसूची २ मध्ये विशेषत: सूट देण्यात न आलेल्या माल व वस्तू | ४.०० |
| | | | |

**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.